RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On: 12 Dec 2014 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 15 Dec 2014

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : बारा | अंक : सहावा | डिसेंबर २०१४



धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 4

परिपूर्ण महात्मा (सत्संग) 5

संत कल्लरपट (एक अद्‌भूत घटनेचे वर्णन) 27

केहर सिंह (एक अद्‌भूत घटनेचे वर्णन) 29

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणितील
कार्यक्रमांची माहिती

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या अपार दयेने ***मुंबई शहरात*** *त्यांच्या मधुर आठवणीत* ***७ ते ११ जानेवारी २०१५*** *रोजी सत्संगाचा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. हा कार्यक्रम* ***भुराभाई आरोग्य भुवन****, शांतीलाल मोदी मार्ग, मयुर सिनेमा समोर, कांदिवली (प) मुंबई ६७ या पत्यावर होईल. रविवार दिनांक* ***११ जानेवारी २०१५*** *रोजी बाबाजींचा* ***भंडारा*** *साजरा केला जाईल. इतर दिवशी खालील वेळापत्रकानुसार कार्यक्रम होईल:*

पहाटे	३:००	ते	५:३०	ध्यान–अभ्यास
सकाळी	७:००	ते	८:००	ध्यान–अभ्यास
सकाळी	९:३०	ते	१०:३०	ध्यान–अभ्यास
सकाळी	११:००	ते	१२:००	सत्संग
दुपारी	१२:००	ते	१२:५०	ध्यान–अभ्यास
दुपारी	४:००	ते	५:००	ध्यान–अभ्यास
संध्याकाळी	५:३०	ते	७:००	प्रश्नोत्तरे व सत्संग
रात्री	८:१५	ते	८:४५	भजने गाण्याचा कार्यक्रम

परमसंत अजायब सिंह महाराजांच्या अपार दयेने ***संतबानी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान*** *येथे* ***सत्संगाचे कार्यक्रम : २६ ते २८ डिसेंबर २०१४, २ ते ६ फेब्रुवारी २०१५, २७ फेब्रुवारी ते १ मार्च २०१५ व ३१ मार्च ते २ एप्रिल २०१५.***

सर्व बंधू–भगिनींनी महाराजजींच्या कार्यक्रमात सहभागी होऊन नामस्मरणाचा व संतवचनांचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

***

परिपूर्ण महात्मा

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज, महात्मा सहजोबाईंची वाणी, मुंबई, महाराष्ट्र – ७ जानेवारी १९९३

मी परमात्मारूप सावन–कृपालजींच्या चरणी वारंवार नमस्कार करतो, ज्यांनी या गरीब आत्म्यावर अतोनात कृपा केली. हुजूर महाराजजी नेहमीच म्हणत असत की,''आंधळ्या व्यक्तीत स्वत:हून डोळस माणसास जाऊन पकडण्याची क्षमता नसते.'' त्याचप्रमाणे शिष्यामध्ये सतगुरुंना समजून घेण्याची वा त्यांना स्वत:हून जाऊन भेटण्याची क्षमता नसते. खरेतर ही सतगुरुंचीच निवड असते. सतगुरुंनाच कल्पना असते की कोणाच्या अंतरात परमात्मा प्राप्तीची खरी तळमळ आहे? तसेच कोणाच्या बाबतीत परमात्म्याने निर्णय घेतला आहे की यास पुन्हा जन्म देऊ नये, या दु:खी जगात पुन्हा पाठवू नये. परिपूर्ण महात्म्यांना प्रेमी दूर वा जवळ असण्याचा काही फरक पडत नाही. अनेकदा प्रेमींना आपल्याकडे बोलाविण्यासाठी ते एखाद्या व्यक्तीस माध्यम बनवितात, त्यांच्याद्वारे प्रेमींना स्वत:बद्दलची माहिती देतात.अनेकदा ते स्वत:हून प्रेमींकडे जातात. अशा घटना आपणांस अनेकदा पहावयास मिळतात.

जीव अंध आहे तर सतगुरु डोळस आहेत. जेव्हा येशू ख्रिस्तांना विचारले गेले की,''तुम्ही रात्रंदिवस का वणवण भटकत आहात? तुमची कोणती वस्तू हरवली आहे?''त्यांनी उत्तर दिले,''माझ्या मेंढ्या वाट चुकून हरवल्या आहेत, मी त्यांचा शोध घेत फिरत आहे.'' याठिकाणी आत्म्यांना मेंढी असे संबोधिले आहे. पल्टू साहेब सांगतात:

उन्हें क्या है चाह फिरत हैं मुल्क बथेरा, जीव तारण कारणे सहंदे दुख बथेरा।

या मेंढीसदेखील परमात्मा कृपालजींनी दया करुन स्वत: घरी येऊन दर्शन दिले, ही त्यांचीच कृपा होती. मी त्यांचा महिमा कसा वर्णन करू? मी नेहमीच त्यांच्यासमोर आर्जव करी,''मी आपला तिळातिळाचा अपराधी आहे.

कणा–कणाचा चोर आहे. क्षणोक्षणी माझ्या हातून गुन्हे घडत असून, मी गुन्ह्यांचे भांडार आहे. मी तुम्हाला शरण आलो असून तुम्ही माझ्यावर कृपा करा, माझी लाज राखा, माझे रक्षण करा.''

संत कनवाळू, दीनदयाळू असतात. जे कोणी दीन बनून त्यांच्या द्वारी जातात, आपले गाऱ्हाणे सांगतात, त्यांचे गाऱ्हाणे संत नक्की ऐकतात, त्यांच्या लज्जेचे रक्षण करतात. परंतु आपण जे गाऱ्हाणे मांडत असतो ते अंत:करणापासून असते की केवळ जिभेने वरवरच्या देखाव्यासाठी इतके बोलत असतो, हे सतगुरु जाणतात. दोघांमध्ये खूप फरक असतो. बाह्य नम्रता केवळ देखाव्यासाठी असते, परंतु खरी नम्रता अंत:करणापासून निवेदित होते. सर्व कर्त्या–करवित्या सतगुरुंचा परमात्म्याशी मेळ झालेला असतो, त्यामुळे ते प्रत्येकाचे हृदय जाणतात. त्यांस माहित असते की कोण अंतर्यातून बोलत आहे व कोण केवळ देखाव्यासाठी बोलत आहे. ते वरवरच्या देखाव्यावर प्रसन्न होत नाहीत.

कालच्या सत्संगात सहजोबाईंनी प्रेमाने आपणांस समजावले की सतगुरुंनी मला कोणती वस्तू दिली? त्यांनी मला अशा प्रदेशामध्ये पोहचविले, जेथे मुंगी पाऊल ठेवू शकत नाही, मोहरीचा एखादा दाणाही टिकू शकत नाही. सतगुरुंनी मला अशा देशामध्ये स्थलांतरीत केले, जेथे जन्म–मृत्यु नाही.

एक ब्राह्मण होता, ज्याने स्वत:चे नाव सर्वजीत असे ठेवले होते. त्या काळी आजच्या सारखे जीप, गाड्या, बस, रेल्वे आणि विमाने यांसारखी प्रवासाची साधने नव्हती. प्रवासासाठी अधिकाधिक बैलांचा वापर केला जात असे. कबीर साहेबांची कीर्ती जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेली होती. कबीर साहेबांशी वाद–विवाद व चर्चा करण्याच्या हेतूने तो सर्वजीत ब्राह्मण बैलावर पुस्तके लादून आला की त्याने किती पुस्तकांचा अभ्यास केला आहे, हे कबीर साहेबांना कळावे. त्यावेळी कबीर साहेब घरी नव्हते. त्यांची पत्नी कमाली मात्र घरीच होती. सर्वजीतने तिला विचारले,''कबीर साहेबांचे घर येथेच आहे का?'' त्यावर कमाली म्हणाली:

कबीर का घर आसमान पे यहाँ सिलहली गैल, पाँव न टिके पपील का पंडित लादे बैल।

तू कबीर साहेबांना देहधाही मनुष्य समजतोस काय? त्यांचे वास्तव्यस्थान हे जग समजतोस काय? त्यांचे खरे घर तर सच्चखण्ड आहे. तेथे तर मुंगी देखील पोहचू शकत नाही, तू तर पुस्तके लादून बैल घेऊन फिरत आहेस. हा दोहा कबीर साहेबांनी उच्चारलेला नसून तो कमालीचा आहे. कबीर साहेबांनी स्वत:देखील त्यांच्या वाणीमध्ये उच्चारण केले आहे:

दिन स्यों रैण वेद नहीं शास्त्र, यहाँ बसे निरंकारा।
कहे कबीर नर तिसे ध्यावो, बाबरया संसारा।।

आपण सांगता तेथे वेद–शास्त्र नाहीत व तेथे वाचणारा किंवा शिकविणारा नाही. तो तर सर्वाधिशाचा देश आहे. संत परमात्म्याची भक्ती करून स्वत: भक्तीरूप बनलेले असतात. त्यांच्या संगतीत येणाऱ्यास ते भक्तीदान देतात, इतकेच नव्हे, त्यास ते तेथे पोहचण्यासाठी सर्वोतोपरी मदतदेखील करतात. तेव्हा सहजोबाईंची वाणी तुम्ही लक्षपूर्वक ऐकावी:

सहजो गुरु बहुतक फिरैं, ज्ञान ध्यान शुधनाँह।
तारि सके नहीं एक कौ, गहैं बहुत की बांह ।।

महाराज कृपाल सांगत असत,''तुम्ही असा कधीही विचार करू नका की एखाद्या शाळेत अधिक विद्यार्थी शिक्षणासाठी जातात, तिथे विद्यार्थ्यांची खूप गर्दी जमते म्हणजे ती शाळा उत्तम आहे. त्याऐवजी कोणत्या शाळेमधील अधिकाधिक विद्यार्थी उत्तीर्ण होतात, यावर तुम्ही लक्ष द्यावे.''

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''एखाद्या महात्म्याकडे खूप गर्दी जमा होते, याचा अर्थ असा होत नाही की तो महात्मा परिपूर्ण आहे. जेव्हा परिपूर्ण शिष्य एखाद्या महात्म्याकडे जातो, तेव्हा त्या महात्म्याच्या पूर्णत्वाची प्रचिती येते. अपूर्ण व ढोंगी गुरु पूर्ण शिष्यास पाहून दूर पळू लागतात की हा शिष्य आपल्याकडून काहीतरी मागेल.'' जेथे पूर्ण सतगुरुंचा महिमा वर्णिलेला आहे, तेथे पूर्ण शिष्याच्या महिमेचे देखील वर्णन केले गेले आहे.

महाराज सावन सिंहजी त्यांच्या सत्संगांमध्ये एक गोष्ट सांगत असत. एकदा एक महात्मा वाटेने जात होते. त्यांना एक मनुष्य म्हणाला की ते पहा महात्माजी! तो जो गायींचा कळप जात आहे, तो किती मोठा आहे. महात्मांनी त्यास अतिशय प्रेमाने विचारले,''त्या कळपामध्ये तुझ्या मालकीचे काही आहे का?''त्यावर तो म्हणाला,''त्या कळपात माझे स्वत:चे काही नाही, परंतु माझ्या काकांचे एक वासरू आहे.'' हे सांगण्यामागे तात्पर्य इतकेच की, जर एखाद्या ठिकाणी खूप मोठा जमाव झालेला असला, तर त्याचा आपल्याला काय उपयोग?'' मग महाराजजी हरिद्वार येथील उदाहरण देत असत की, तेथे पन्नास लाखांपेक्षाही अधिक लोक जमतात. परंतु तेथे होते काय? तर ईर्षा, वाद-विवाद व भांडणे होतात. एक पंथ दुसऱ्या पंथास हीन समजतो. दिगंबर पंथीय म्हणतात की, सर्वप्रथम आमची मिरवणूक निघावी तर सन्यासी म्हणतात आमची मिरवणूक सर्वप्रथम निघावी. बस, तेथे केवळ यागोष्टींवरूनच वाद-विवाद, भांडणे होतात. जर तेथे एखादा परमेश्वर प्रेमी उपस्थित असता, तर इतके वेश कशासाठी व आपसात इतकी ईर्षा का असावी?

आजकाल हा प्रश्न नेहमी उठतो की जितके शिष्य नाहीत तितके गुरु नजरेस पडतात! मग आपल्या हृदयात विश्वासच बसत नाही की इतक्याजणांत खरे गुरु कोण आहेत? खरे संत आहेत तरी का? असल्यास ते कोण आहेत? असाच प्रश्न महाराज सावन सिंहजींना देखील विचारला गेला की पूर्ण संतांनी स्वत:ची अशी काहीतरी खूण ठेवावी. त्यावर महाराजजी हसून म्हणत,''काय त्यांनी स्वत:च्या कपाळावर अशी पाटी लावावी की आम्हीच खरे संत आहोत.''

परिपूर्ण महात्म्यांना लोक किती मानतात. या जगातील लोकांनी काही परिपूर्ण महात्म्यांची चामडी सोलून टाकली, कोणा महात्म्यास जिवंतपणी सूळावर चढविले, तर कोणास तप्त तव्यावर बसविले. परिपूर्ण महात्म्यांची आपण किती कदर केली? ज्या आत्म्यांना सच्चखंडात नेण्याचा निर्णय परमात्म्याच्या दरबारात झालेला असतो, त्याच आत्म्यांना संदेश देण्यासाठी

परिपूर्ण महात्मा या जगामध्ये येतात. वाणीमध्ये वारंवार परिपूर्ण तसेच अपूर्ण महात्म्यांचे वर्णन केलेले आहे. जेथे पूर्ण महात्म्यांचा संदर्भ येतो, तेथेच अपूर्ण महात्म्यांचाही संदर्भ येतो. पूर्ण महात्मा कोणत्याही प्रकारचे ढोंग रचून जगास प्रदर्शन करीत नाहीत. ते स्वत: शब्द–नामाची कमाई करीत शब्दरूप बनलेले असतात, सतपुरुषाच्या दरबारात पोहचून ते स्वत:च सतपुरुषाचे स्वरूप बनलेले असतात.

प्रियजनहो! हे एक सत्य आहे कि परिपूर्ण महात्मा चुकूनही एखाद्याची निंदा करीत नाहीत. ते प्रत्येकाची प्रशंसाच करतात. हीच महात्म्याची निशाणी असते. त्यांच्या अंतरामध्ये इतरांप्रती ईर्षा किंवा मत्सर नसतो, ते विषय–विकारांच्या पलिकडे पोहचलेले असतात. ज्या ठिकाणी एकमेकांची निंदा नालस्ती केली जाते, तुम्ही समजून जा की तेथे व्यतीत केलेला वेळ व्यर्थ गेला. महात्मा स्वत: कोणाची निंदा करीत नाहीत, तसेच ते त्यांच्या सेवकांना देखील इतरांची निंदा करण्याची परवानगी देत नाहीत.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''सत्याची कास धरणारा मनुष्य योग्य वेळ येण्याची वाट पाहत राहतो. कारण त्याचा विश्वास असतो की योग्य वेळ स्वत:च इतरांना सत्य विदीत करते. परंतु खोटा व ढोंगी मनुष्य त्याचे वागणे व सांगणे कसे खरे आहे याची सत्यता पटवित राहतो.''

महाराजजी दादू दयालजींची गोष्ट सांगत असत की एकदा दोन ब्राह्मण दादू दयालजींकडे उपदेश प्राप्त करण्यासाठी गेले. दादू दयालजी अतिशय दयाळू तसेच सुशिल स्वभावाचे परिपूर्ण महात्मा होते. दादूजी आश्रमा बाहेर चालले होते. दादूजींनी आपल्या डोक्यावरील सर्व केस कापून टाकलेले होते.

अनेक लोक घराबाहेर पडताना कोणी शिंकल्यास किंवा कुत्र्याने कान हालविल्यास ते अपशकून मानतात व पुढे न जाता घरीच थांबतात. अशी विचारसरणी माझ्या वडिलांची देखील होती. मी वडिलांना म्हणत असे, कुत्र्याकडे हार्मोनियम तर वाजविण्यासाठी नसतो, त्याच्याकडे कान आहेत

तेव्हा तो बिचारा कान हालवित आवाज करतो. अशा प्रकारचे लोक त्यांना डोक्यावरील पूर्णपणे केस काढलेला माणूस दिसल्यास तो अपशकून मानतात.

त्या ब्राह्मणांनी दादू दयालजींना केसहीन डोक्याने जाताना पाहिल्यावर विचार केला की आपण तर महात्म्यांचे दर्शन करण्यासाठी आलो होतो, परंतु ह्यास पाहून अपशकुन झाला. आता त्याचे प्रायश्चित्त केले पाहिजे. त्यांनी दादू दयालजींच्या डोक्यावर ठोमणा (टोला) मारला व त्यांना विचारले,''अरे बंधु! दादूंचा आश्रम कोठे आहे?'' दादूजी शांत व सुशिल स्वभावाचे महात्मा होते. त्यांनी खुणेनेच सांगितले की, जेथे तुम्ही आलेला आहात, तोच आश्रम आहे. ब्राह्मण पुढे आश्रमात गेले. आश्रमामध्ये सत्संगासाठी दादूजींची लोक वाट पाहत होते. ब्राह्मणांनी प्रेमींना दादूजींबद्दल विचारले असता, ते म्हणाले, महात्माजी बाहेर गेले असून आता ते येतीलच. ब्राह्मणांनी पाहिले की ज्यांच्या डोक्यावर त्यांनी प्रायश्चित्त म्हणून ठोमणा मारला होता, तेच महात्मा सत्संग करीत होते. त्या ब्राह्मणांना आपल्या गैर वर्तणुकीबद्दल लाज वाटली.

दादू दयालजी अत्यंत नम्र होते. ते सत्संगामध्ये म्हणाले, आपण दोन पैशांचे साधे मडके विकत घेतानाही ते वाजवून पक्के असल्याची खात्री करून घेतो. तुम्ही तर सतगुरुंवर सर्वस्व अर्पित करणार असता. त्यामुळे सतगुरुंची देखील विचारपूस करून खात्री करून घेणे काही गुन्हा नसतो. नाम घेण्याअगोदर तुम्ही कितीही त्यांच्याबद्दल खात्री पटवून घेण्यासाठी विचारपूस करून घ्या. परंतु नाम घेतल्यावर मात्र जो मार्ग महात्मा आपणांस दर्शवतात, तो मार्ग अनुसरल्यास तुमचा फायदाच होईल.

मी नेहमी सांगत असतो की, कोणाही महात्म्यांच्या चरणी जाण्याअगोदर तुम्ही त्यांचे जीवन चरित्र पडताळून पहा की त्यांनी दहा-वीस वर्षे ध्यान-अभ्यास केलेला आहे का? संसारीक गोष्टींचा त्याग केलेला आहे का? ही अतिशय महत्वाची व समजून घेण्याची गोष्ट आहे. जगातील कोणतीही गोष्ट मिळवायची असेल, तर त्यासाठी मेहनत करावी लागते.

वेदना सहन केल्यानंतरच आई बाळास जन्म देते. मोत्यांचा शोध घेण्यासाठी खोल समुद्रामध्ये बुडी मारावी लागते. सोने खाण खोदूनच काढू शकतो. जर जगातील कोणतीही गोष्ट प्राप्त करण्यासाठी मेहनत करावी लागते, तर काय परमात्म्याची भक्तीच अशी आहे जी मेहनत केल्याशिवाय, सतगुरुंच्या आज्ञेचे पालन केल्याशिवाय प्राप्त होईल? मेहनती मनुष्यच सतगुरुंच्या आज्ञेचे पालन करतो. ध्यान-अभ्यास करण्याचे टाळणारे शिष्य मात्र केवळ देखाव्यासाठी नेत्र मिटून बसतात व सतगुरुंच्या पुढे-मागे धावपळ करतात.

रसल पर्किन्स नेहमी एक गोष्ट सांगतो की एका मालकाकडे दोन नोकर होते. एक नोकर मालक तेथे आला असता खूप धावपळ करीत असे. मालक गेल्यावर मात्र तो खाऊन-पिऊन आराम करी, झोपी जाई. त्यानंतर कोणतेही काम करीत नसे व मालकाच्या आज्ञेचे पालन करीत नसे. दुसरा नोकर मात्र तेथे मालक असो वा नसो, खूप मेहनत करीत असे. आता तुम्ही विचार करा! मालक कोणत्या नोकरावर प्रसन्न होईल? जो मालकाची आज्ञा मानतो, त्यास तेथे उपस्थित आहे असे समजून काम करीत राहतो, त्याच्यावरच मालक प्रसन्न होईल. सतगुरुदेखील त्याच शिष्यावर प्रसन्न असतात, त्याच्याच लज्जेचे रक्षण करतात, जो शिष्य त्यांना सर्वव्यापी, सर्वत्र उपस्थित मानतो, प्रामाणिकपणे स्वत:चा ध्यान-अभ्यास करतो.

परिपूर्ण महात्मा स्वत: नामाची कमाई करतातच आणि आपल्या सेवकांना देखील सांगतात की मुलांनो! तुम्ही नामाची कमाई करा, ध्यान-अभ्यास करण्याचे टाळू नका. ते स्वत: काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकारापासून दूर राहातात आणि सेवकांनाही उपदेश करतात की तुमच्या शरीरामध्ये हे पाच चोर आहेत. सर्व संतांनी या पाच चोरांचा उल्लेख केलेला आहे. काही संतांनी यांस पाच चोर, काहींनी पाच डाकू तर काहींनी यांस पाच लुटारू असे संबोधले आहे. सृजनहारी परमात्म्याने आपल्या शरीराची रचना करताना त्यामध्ये अमृत ठेवले आहे. ते अमृत हे पाच चोर लुटत आहेत.



अमृत लूटे मनमुख नी बूझे।

आपण लुटले जात आहोत याची आपणांस कल्पनादेखील नसते. एक चोर जरी घरात घुसला तरी तो घरात काहीच बाकी ठेवत नाही. ज्या घरात पाच चोर घुसले असतील व त्याघरचा मालक झोपलेला असेल तर मग घरात काही बाकी ठेवावे का नाही ही चोरांची मर्जी आहे. गुरू रविदासजी सांगतात:

मृग मीन भृंग कुंचर पतंग एक दोख विनाश।
पांच दोख असाध जामें ताकी के तक आस।।

मृग कर्ण विषयाच्या (इंद्रियगोचर वस्तूच्या) आहारी गेलेला असतो. शिकारी जंगलात जाऊन एक वाद्य वाजवितात ज्यास राग घंडा हेरी असे देखील म्हणतात. मृग सहसा सामान्य मनुष्याच्या जवळ देखील जात नाही, परंतु त्या वाद्याचा ध्वनी ऐकून तो मृग धुंद होतो व आपले डोके शिकाऱ्याच्या मांडीवर ठेवतो. शिकारी त्याची हत्या करून त्याचा खिमा करतात व पातेल्यात त्यास शिजवतात. अशाप्रकारे मृग कर्ण विषया पोटी आपले प्राण गमावतो.

पतंग किड्यास नेत्रांचा विषय असतो. तो प्रकाशाशी अनुरक्त असतो. दिवा प्रज्वलित झाल्यावर तो हे पहात नाही कि हा प्रकाश कोणाचा आहे? तो दिव्याच्या ज्योतीजवळ जाऊन आपले पंख जाळून घेतो, आपले प्राण गमावतो. अशाप्रकारे नेत्रांचे विषय त्याचे प्राण घेतात.

माशास जिव्हेचा विषय असतो. मासेमारी करणारे लोक गळास मांसाचा तुकडा लावून तो गळ नदी, समुद्र वा खोल तलावामध्ये टाकतात. मांसाचा तुकडा पाहून माशास तो खाण्याचा मोह आवरत नाही. मासा तो मांस अडकवलेला गळ स्वतःच्या घशात अडकवून घेतो. मासेमारी करणारे त्यास पाण्याबाहेर काढून त्याचा खिमा करून त्यास पातेल्यात शिजवतात. जिव्हेच्या विषयाने माशाची काय अवस्था करून टाकली?

हत्तीस कामाचा विषय असतो. खरेतर हत्ती अतिशय शक्तीमान प्राणी असतो. हत्तीस पकडणारे लोक खूप खोल खड्डा खणतात. तो खड्डा गवत–पानांच्या तकलादु आवरणाने टाकून झाकतात व त्यावर कागदी बनावटीची एक हत्तीण बनवून उभी करतात. कामवश झालेला हत्ती, सत्य न जाणून घेताच, त्या खड्ड्यामध्ये पडतो. तेथे त्यास तहानलेल्या–भुकेलेल्या अवस्थेत बरेच दिवस राहावे लागते, ज्यामुळे तो अशक्त होतो. माहूत लोक त्यास अंकुश मारुन–मारुन बाहेर काढतात. कामाच्या आहारी गेल्याने इतका बलाढ्य प्राणी असूनही त्यास मनुष्यास खांद्यावर घेऊन फिरावे लागते. मी नेहमी सांगतो, काम मनुष्यास अंध बनवते, त्यास शेजारी उभा असलेला मनुष्यदेखील दिसत नाही. कामी निर्लज्ज होतो, स्वतःचे नाते–संबंधदेखील विसरून जातो.

केवळ एक–एक दोषानेसुद्धा यासर्वांचे काय हाल झाले. मनुष्यामध्ये तर हे पाचही दोष आहेत. मग तो कसा बरे यापासून स्वतःचा बचाव करू शकेल? परंतु आपली बुद्धी विचित्रच आहे. यापासून बचाव व्हावा म्हणून आपण जप–तप, पूजा–पाठ करतो, मंदिर–मस्जिद व इतर धर्मस्थानांच्या यात्रादेखील करतो. इतरही अनेक प्रकारची साधने उदा. जलधारे (डोक्यावर पाण्याची

धार सोडून केलेला तप), धुनीतप (चोहोबाजूंनी आग लावून केलेला तप) करतो. हे सर्व उपाय आपण या पाच विषयांना वश करण्यासाठीच करतो. परंतु हे विकार आपल्यावश होण्याऐवजी आणखीन प्रज्वलित होतात.

आपणांस असे अनेक लोक भेटतील जे असा दावा करतात की आम्ही या पाचही विषयांना आपल्या वशात केलेले आहे, परंतु ते तात्पुरते व केवळ थोड्या काळापुरतेच असते. आपण एखाद्या विषारी सापास पकडून टोपलीत कोंडून ठेवल्यास त्याचा राग अजूनच वाढतो आणि संधी मिळताच तो दंश करतो. अशीच परिस्थिती आपल्या मनाची आहे. आपणांस वाटते की आपले मन वश झाले आहे. परंतु जेव्हा भोगांचे वादळ निर्माण होते, तेव्हा हेच मन आपणांस प्रेरित करून घरी घेऊन येते. अंतरामध्येच मन आपली समजूत घालते की, मी तर परमात्म्याकडून परवानगी घेतली आहे. अनेक माणसे तर अशाप्रकारचे सोंग रचतात की असे करण्यासाठी गुरूंनीच आम्हांस प्रेरित केले मी नेहमी सांगतो की, सतगुरुंना कोणीही फसवू शकत नाही. जे कार्य सतगुरुंचे अंतर्यातील स्वरुप करत असते त्याची माहिती सतगुरुंच्या बाह्यस्वरूपाला असते तसेच बाह्य स्वरूप करीत असलेल्या कार्याची संपूर्ण माहिती अंतर्यातील स्वरूपाला असते.तरीदेखील मनाच्या नादी लागून आपण सतगुरुंना फसविण्याचा प्रयत्न करतो की तुम्ही मला असे करण्याचा अंतर्यामधून आदेश दिला होता.

आता तुम्हीच विचार करून पहा! सतगुरु तर रात्रं-दिवस आपला या अपवित्र गोष्टींपासून बचाव करतात. यापासून ते स्वत: अलिप्त राहतात आणि आम्हांसदेखील समजावतात,''हे बघ मुला! गण-गंधर्व तसेच इतर ज्या कोणीही यांचा आस्वाद घेतला, ते पस्तावले. एकदा जर हे विषय-विकार स्वरूपी विष मस्तिश्कावर चढले, तर ते आयुष्यभर उतरत नाही.'' म्हणूनच सहजोबाई प्रेमाने समजावत आहे की, जे स्वत: विषय-विकारांपासून अलिप्त आहेत, अशाच सत्पुरुषांच्या शरणी आपण जावे; कारण जे स्वत: बचावलेले असतात, केवळ तेच आपलाही बचाव करू शकतात.

ऐसे गुरु तौ बहुत हैं धूत धूत धन लेहिं।
सहजो सतगुरु जो मिलै, मुक्ती धाम फल देहि।।

जे गुरु स्वत:चा उदरनिर्वाह सेवकांच्या पैशातून करतात, स्वत:चे ओझे सेवकांवर लादतात असे गुरु जागोजागी सापडतील. वाटेत विट उचलली तर त्याखाली (जागोजागी) आपणांस असे भोंदू गुरु इतके सापडतील, जितके शिष्य सापडणार नाहीत. कबीर साहेब सांगतात, जर गुरु लोभी असेल व शिष्य लालची असेल, तर ते एकमेकांशी एकप्रकारे डाव खेळत असतात. शिष्य म्हणतो, शपथ घेण्यासाठी गुरु मिळाले आहेत, तर गुरु म्हणतात, हा आलाच आहे तर काही ना काही दान–दक्षिणा देईलच.

मी नेहमी सांगतो की जे महात्मा शब्द–नामाची कमाई करतात, ते स्वत: स्वकष्टाने कमावलेले धन लंगरसाठी वापरतात, हीच त्यांची खूण आहे. गुरु नानकदेवजी महाराज सांगतात :

घाल खाए कुछ हत्थो दे, नानक राह पछाणे से।

आजपर्यंत संतमतामध्ये जे कोणी परिपूर्ण महात्मा आले आहेत ते सदैव हेच सांगत आले आहेत, कबीर साहेब सुद्धा सांगतात :

मर जाऊं मांगू नहीं अपने तन के काज,
परस्वार्थ के कारणे मोहे न आवे लाज।

आपले धन पवित्र करण्यासाठी परिपूर्ण महात्मा ते एखाद्या गरीबाची मदत करवून देतात, परंतु स्वखर्चासाठी इतर कोणासमोरही हात पसरत नाहीत. त्यासाठी ते स्वमेहनतीने शेती करतात, व्यापार करतात अथवा नोकरी करतात. हीच परिपूर्ण महात्मांची खूण, त्यांची ओळख असते. परिपूर्ण महात्मा आत्म्यांची मोफत व निस्वार्थ सेवा करतात, जसे सूर्य प्रत्येकास आपला प्रकाश मोफत देतो. परमात्मा गरीब–श्रीमंत सर्वांस हवा मोफत देतो. जो साधु संगतची सेवा करतो व स्वमेहनतीच्या कमाईतून लंगरमध्ये सुद्धा योगदान देतो, अशा व्यक्तीसाठी परमात्मा आपले द्वार उघडतो.



कबीर साहेबांनी विणकाम करुन आपल्या जीवनाची उपजीविका चालविली, संत रविदासांनी जोडे बनवून आपला उदरनिर्वाह चालविला, महाराज सावन सिंहजींनी तसेच महाराज कृपालजींनी देखील आपल्या पेनशन मधुन आपला चरितार्थ चालविला. परिपूर्ण महात्मा सेवकांनी केवळ ध्यान–अभ्यास करावा हीच आशा बाळगतात. ते सांगतात ध्यान–अभ्यासाची पुंजी गोळा करुन आणा. त्यांच्या अंत:करणात ध्यान–अभ्यासाची नैसर्गिकच ओढ असते.

कुटुंब जाल जित तित रुपो, पशु पक्षी नर माहि।
सहजो गुरु भडकी बचे, निगुरा उरझत जाहि।।

सहजोबाई सांगतात, आपण कुटुंबातच अडकलेलो होतो म्हणून कुटुंबातच जन्म घेत राहिलो, कधी पशू तर कधी पक्षी बनलो. गुरूंनी हात धरुन मला बाहेर काढले. गुरू नानक देवजी म्हणतात:

गुरु जिन्हां न चेतया मन अपने सचेत।

जे असे म्हणतात की आम्हांस गुरूंची गरज नाही, ते आपल्या मनाच्या प्रभावाखाली असतात व ती त्यांची चुकीची समजूत असते. गुरू न केलेल्या मनुष्याची हमी कोण भरेल? त्यांस जन्म–मृत्युच्या दु:खातून कोण काढेल?

बार बार नाते मिलै, लख चौरासी माँह।
सहजो सतगुरु ना मिलैं, पकरि निकासै बाँह।।

मुसलमानांच्या पवित्र ग्रंथात उल्लेख केलेला आहे की, जेव्हा आपण चुका करतो तेव्हा आपण खालच्या थराच्या योनींमध्ये जातो. सहजोबाई देखील हेच सांगतात की आपण चौऱ्याऐंशी लक्ष योनींमध्ये जाऊन माहित नाही किती पती बनविले व किती पत्नी बनविल्या, किती मुलांना जन्म दिला व कितीजणांशी विरह झाला, किती योनी भोगल्या व भविष्यातही किती योनी भोगणार आहोत याची देखील कल्पना नाही. हे सर्व यासाठी झाले कारण कोणत्याही योनीत आपणांस शब्दरूपी, मुक्तीदाता गुरू लाभले नाहीत. जर शब्दरूपी मुक्तीदाता

गुरू लाभले असते तर काय आपण चौऱ्याऐंशी लक्ष योनींमध्ये गेलो असतो? जर सच्चे गुरू लाभल्यानंतरही आपणांस चौऱ्याऐंशी लक्ष योनींमध्ये जावे लागले तर मग अशा गुरूंकडे जाण्याचा काय फायदा?

जन्म जन्म हर संग ही, मिलि रहो आठौ याम।
सहजो गुरु के बिन मिले, पायो ना विश्राम।।

नि:संशय सर्व जग म्हणते की परमात्मा सर्वव्यापी आहे, तो प्रत्येक जीवात वसतो. ज्याप्रमाणे जमीनी खाली काही ठिकाणी दहा-वीस फुट खोलवर तर काही ठिकाणी शंभर फुट खोलवर पाणी सापडते. परंतु तहान त्याच लोकांची भागते जे विहीर खोदून त्यातून पाणी काढतात.

सहजोबाई सांगतात की आपण जेव्हा हत्ती, घोडा किंवा पक्षी बनलो होतो तेव्हा देखील आपल्या अंतरात परमात्मा उपस्थित होता. परंतु कोणीही आपले रक्षण केले नाही. याजन्मी गुरु चरणदासजी प्राप्त झाले, त्यांनी माझा हात धरून मला इथून काढले. गुरुंच्या घरी परमेश्वर आहे.

मी नेहमी सांगतो की संत परमात्म्यापेक्षा मोठे नसतात. परंतु त्यांनी भक्ती करुन परमात्म्यास आपल्या प्रेमाच्या साखळीत बांधून स्वत:वर खूष करुन घेतलेले असते. प्रिय पुत्र आपल्या पित्याकडून हवं ते प्राप्त करवून घेऊ शकतो. संत देखील परमात्म्याचे प्रिय पुत्र असतात. प्रिय पुत्र तोच असतो जो आपल्या वडिलांचे सांगणे ऐकून त्यानुसार चालतो.

घरच्या एखाद्या व्यक्तीचा मृत्यु झाला अथवा व्यापारात नुकसान झाले तर गुरुंना दोष देऊ नये की अशा गुरुंना सोडून द्या. गुरुमुख तोच आहे जो अशा घटनेस परमेश्वराची मर्जी समजून स्वीकारतो.

महाराज सावन सिंहजी आपल्या जीवनातील एक घटना सांगत असत की त्यांचा बत्तीस वर्षांचा मुलगा पर्यवेक्षक म्हणून काम करीत असे. त्यांनी ब्यास स्टेशनवर त्याचा शेवटचा श्वास पूर्ण केला. त्यांनी विचार केला की यास



जर आश्रमात घेऊन गेलो तर बीबी रुक्को बाबा जयमल सिंहजींना विनंती करेल की याचे प्राण वाचवा. तसे झाल्यास माझ्या गुरुमुखतेवर परिणाम होईल. महाराजजी म्हणाले, जेव्हा माझ्या मुलाने आपला शेवटचा श्वास पूर्ण केला तेव्हा मी माझे हृदय चाचपडून पाहिले, त्यावेळी ना मला आनंद वाटला ना दु:ख वाटले. ही माझ्या सतगुरु बाबा जयमल सिंहजींचीच दया होती.

महाराज कृपाल सांगत असत, जेव्हा ते कोणताही खाद्यपदार्थ घरी आणत असत तेव्हा त्यांचा मुलगा सर्व पदार्थांवर हात ठेवून म्हणत असे की हे मीच खाणार. तेव्हा आपण म्हणत असत की तू हवं तेवढं खा आणि जर बाकी राहिला तर आम्ही खाऊ, परंतु तू धीर धरुन हळू खा. जेव्हा आपला मुलगा आजारी पडला तेव्हा आपण आपल्या पत्नीस म्हणालात की तू म्हणशील तो चांगल्यातला चांगला डॉक्टर मी बोलावून घेतो, तू नंतर असे म्हणू नये की ह्याचा नीट औषधोपचार केला नाही. शेवटी त्या मुलाने देहत्याग केला.

जेव्हा स्मशानात त्या मुलाची अंतिमक्रिया करण्यासाठी गेले तेव्हा महाराज कृपालजींच्या चेहऱ्यावर दु:खाची छबी नव्हती. ताईजींचे पती राजाराम सराफ आर्य समाजाचे पुढारी होते. त्यांच्या हृदयावर या गोष्टीचा खूप प्रभाव पडला की यांचा मुलगा निधन पावला असूनही यांच्या चेहऱ्यावर दु:ख झळकत नाही, हे खरोखरीच एखाद्या परिपूर्ण महात्म्यांचे शिष्य आहेत. महाराज कृपालजींना पाहूनच राजा राम सराफ यांनी महाराज सावन सिंहजींच्या चरणी जाऊन नामदान प्राप्त केले. महाराज कृपाल आणि राजा राम सराफ यांचा स्नेहसंबंध शेवटपर्यंत राहिला.

सहजो गुरु पूरण मिलै, शिश मैला घट चित्त।
मेह वरसै कालरा जिमीं, खेत न उपजै छित्त।।

सहजोबाई सांगतात की परिपूर्ण महात्मा जरी मिळाले परंतु जर शिष्य मलिन असला तर ते ह्याप्रमाणे आहे, जसे ओसाड जमीनीवर भले कितीही पाऊस पडला तरी त्या जमीनीत काही पिकत नाही.

मलयागिरि के निकट जो, सब द्रुम चंदन होय।
कीकर सीसौं चीढ़ तरु, हुए न कबहूँ होय।।

आता सहजोबाई सांगतात की चंदनाचे झाड त्याच्या सानिध्यातील सर्व गोष्टींमध्ये आपला सुगंध भरुन देते. परंतु कीकर वा चिनारची झाडे मात्र तो सुगंध ग्रहण करीत नाहीत. कबीर साहेब सांगतात:

सतगुरु पूरा क्या करे जे सिक्खन में चूक, अंधे एक न लग्गी ज्यों बाँस बजाई फूँक।

सिख माटी सिख पाथरा, सिख लकड़ी सम जोय।
सहजो गुरु पारस लगै, कैसे कंचन होय।।

आता सहजोबाई सांगतात की जर शिष्य मातीसारखा, लाकडासारखा असला, तो पाषाणहृदयी असला, मग भले गुरु परिस असले तरी शिष्य त्यांच्या स्पर्शाने सोने बनत नाही कारण परिस वनस्पतीत हा गुण असतो की त्याचा स्पर्श केवळ लोखंडास होताच त्यालोखंडाचे सोने बनते.

शिष्य सराई तेल बिना, वाती भी नहिं माहि।
सहजो गुरु दीपक मिले, चांदन होसी नाहि।।

सहजोबाई प्रेमाने सांगतात की ज्या शिष्याची अशी परिस्थिती होते की जसे कंदिलात ना तेल आहे, ना त्याचे यंत्रभाग (पार्ट) ठिक आहेत. मग जरी त्यास प्रकाशरूप गुरु जरी लाभले असले तरी तो कंदिल प्रज्वलित, प्रकाशमान कसा होईल? महाराज सावन सिंहजी सांगत असत,''ज्या कंदिलाचे यंत्रभाग ठिक आहेत, ज्यात तेलही आहे व ज्यात वातही आहे, त्या कंदिलास केवळ माचिसची काडी लावताच तो प्रज्वलित होतो. परंतु जो कंदिल दुरुस्त करणे बाकी असते, ज्यात तेल घालणे व वात लावणे बाकी असते, त्यास प्रज्वलित करण्यास वेळ लागतो. आपली देखील अशीच परिस्थिती आहे.'' मी नेहमी सांगतो की सच्च्या शिष्याचे गुरूंकडे जाणे म्हणजे कोरड्या दारूगोळ्याने आगीकडे जाण्यासारखे असते.



सहजो गुरु समरथ कला, सर्वदेश सब अंग।
कोई कैसा शिष्य हो, सब पर गैरै रंग।।

सहजोबाई सांगतात की संतसतगुरू दीनदयाळू असतात.

जैसो तैसो पातकी आवे गुरु की ओट,गाठी बांधी संसय न परखे खर खोट।

गुरु जाणतात की मी यास नामाशी जोडलेले आहे. जे लोक प्रेमभावनेने व श्रद्धेने ध्यान–अभ्यास करतात, त्यांच्या अंतर्यात प्रकाशही दिसू लागतो व शब्दधुन देखील ऐकू येऊ लागते. हे सर्व त्यांच्या प्रेमभावनेवर, श्रद्धेवर व परिश्रमावर अवलंबून असते.

सहजो गुरु रंगरेज सा, सब ही के रंगिदेत।
जैसा तैसा वसन हो, जो कोई आवै श्वेत।।
सहजो गुरु दर्शन दियो, पूरि रहे सब ठौर।
जहां तहां गुरु ही लखे, दृष्टि न आवै और।।
देखत ही आनंद भए, सदगुरु पहुँचे आय।
भवसागर दुख रोप सों, सहजो लई बचाय।।

सहजोबाई सांगतात की जेव्हा आपला आत्मा गुरूंचे दर्शन करुन धुंद होतो, तेव्हा हर्ष प्रकट होतो. माझे खूप आहोभाग्य आहे की गुरु मला दर्शन देत आहेत व गुरुवचन ऐकवित आहेत, त्यावेळी समजा की आपला मळ धुवून स्वच्छ होण्यास सुरुवात झालेली आहे व काही धुवून स्वच्छ झालेलो आहोत. दर्शन केल्याने आपली जितकी पापं नष्ट होतात, तितकी पापं ध्यान–अभ्यास केल्याने देखील नष्ट होत नाहीत. दर्शनाची खूप महानता असते. जेव्हा संत–सतगुरु या संसारातून सच्चखंडात निघून जातात, तेव्हा जो ध्यान–अभ्यासात प्रगती करून अंतर्यात गेलेला शिष्य असतो त्याची अवस्था पहा, तो झोपेत, जागृत अवस्थेत, चालता फिरता सुद्धा सतत अश्रू ढाळत असतो. त्याच्याशी जेव्हा आपण बोलतो तेव्हा त्याच्या नेत्रांमधून आपोआपच अश्रू वाहू लागतात.

एकदा एका प्रेमीने मला विचारले की तुम्ही स्वत:च सत्संगात सांगता की:

सन्त मुए क्या रोईए जो अपने गृह जाए, रोवो साकत बापुरे जो हाटो हाट बकाए।

तुम्ही असे म्हणता तर मग इतके का रडता? मी त्यास उत्तर दिले की त्यांच्या दयेने मला हे ज्ञान झाले आहे की गुरुंच्या दर्शनाने जो फायदा होत होता, आता ते संसारातून गेल्याने तो फायदा होणे बंद झाले आहे. दर्शनामुळे खूपच आनंद होतो. दर्शनामुळे अनेक पापांचा नाश होतो.

माझ्या स्वत:च्या गावची घटना आहे, जी मी नेहमी संगतला सांगत असतो. ही घटना मासिकातही छापली गेलेली आहे. आमच्या गावच्या एका इसमाला अबोहर येथे महाराज कृपालजींचे चालत्या गाडीतून जाताना दर्शन झाले. आमच्या गावच्या त्या इसमाचे नाव हरनाम सिंह होते. तो हरीजन जातीचा असून त्यास मद्यपानाचे तसेच धुम्रपानाचे दुर्व्यसन होते. महाराजजी गाडीतून जात असता त्यांचा मनमोहक चेहरा पाहून त्यांच्याशी नजरा-नजर झाली व त्यांचा चेहरा हरनामच्या नेत्रांमध्ये सामावून गेला. अबोहर आमच्या गावापासून पन्नास मैलावर आहे. तो दुसऱ्या दिवशी आमच्या गावी पोहचला.

आमच्या गावकऱ्यांचा येण्या-जाण्याची वाट माझ्या शेतातूनच जात असे. लोकांचे सामान आपल्या गाढविणीवर वाहून हरनाम सिंह आपला उदरनिर्वाह करीत असे. तो माझ्याशी बोलत असताना त्याची गाढविण माझ्या शेतात चरू लागली. त्याने मला सांगितले, आपणांस संत-महात्मांना भेटण्याची खूप आवड आहे, आपण त्यांच्या अनेक गोष्टी देखील सांगता. काल मी एक अत्यंत प्रभावशाली चेहरा पाहिला, ते गाडीतून जात होते. तो चेहरा अजूनही माझ्या डोळ्यांपुढे सारखा येतो. त्यांचा चेहरा गुरु नानक देवजींसारखा होता.

एक माणूस आमच्या जवळूनच त्या वाटेने जात होता, तो हरनाम सिंहास म्हणाला की तू आपल्या गाढविणीला यांच्या शेतात चरण्यास मिळावे म्हणून यांना अशा गोष्टी सांगत आहेस. मी त्यास म्हणालो तू असे बोलू नकोस. कारण हरनाम सिंह सांगत असलेली प्रत्येक गोष्ट माझ्या हृदयात घर करीत होती.

काही दिवसांनंतर जेव्हा तो शेतात कापणी करीत होता तेव्हा त्याने त्याच्या मुलास मला बोलाविण्यासाठी पाठविले. मी धावत त्याच्याकडे पोहचलो. मी पोहचता क्षणीच तो घरंगळून पडला. मी त्याचे डोके माझ्या मांडीवर ठेवले व विचारले,''हरनाम, काय झाले?'' त्याने डोळे उघडले व म्हणाला, ''मी अबोहरमध्ये ज्यांचे दर्शन केले होते, ते महात्मा विमान घेऊन आले आहेत आणि मी त्यांच्या सोबत जात आहे. ते महात्मा एक वर्षानंतर येथे येतील'' खरोखरीच हुजूर महाराजजी एका वर्षानंतर तेथे आले. आता तुम्हीच विचार करून पहा, गाडीचा किती वेग असतो? केवळ तितक्या दर्शनाने त्याचे जीवन सफल झाले. कबीर साहेब सांगतात:

जब तू आवें आंख में आंख झांप मैं लू, न मैं देखूं और को न तुझे देखन दूं।

जर तुम्ही माझ्या नेत्रांमध्ये आलात तर मी माझे नेत्र बंद करुन घेईन. मी इतरांस आपल्याला पाहू देणार नाही व मी स्वत: देखील इतरांकडे पाहणार नाही. आपण भजनांमध्ये वाचता की:

मैं पलकां च रख लां छुपाके तैनूं , तूं दिल वाले वेहड़े च आ के तां देख।

तू एकदा माझ्या हृदयाच्या अंगणात येऊन तरी पहा, मी तुम्हांस आपल्या पापण्यांमध्ये लपवून आपले नेत्र बंद करुन घेईन, मी तुमची कदर करेन.

चरणदास के चरण पर, सहजो वारे प्रान।
जगत व्याधि सों काढ़िकर, राखी पद निर्वान।।
सहजो गुरु महिमा कही, पढ़ि सुनि हियो सिराय।
उपजै गुरु की भक्ति दृढ, दुविधा दुर्मति जाय।।

सहजोबाईंनी संपूर्ण वाणी उच्चारल्यानंतर अखेरीस एकच गोष्ट सांगितली आहे की मी आपणांस परिपूर्ण महात्मांचा महिमा, गुरुंची कदर, गुरुंची भेट याविषयांवर हितोपदेश केलेला आहे. जो ही वाणी वाचेल, ऐकेल आणि आपल्या जीवनात अंगिकार करेल, त्याने समजून जावे की मी मुक्तीच्या द्वारात पोहचलो आहे. गुरुंची कदर त्यासच असेल, ज्याच्या हृदयात गुरुंचे प्रेम

जागृत होते व जो गुरूंच्या आज्ञेची पालना करतो. संत नामदानाच्या वेळी सांगतात,''आपण माझ्या देहापेक्षा माझ्या वचनांची कदर करा. तसे केल्याने आपला खूप फायदा होईल.'' एका व्यक्तीने गुरू रामदासजींना विचारले की आपण मनास कसे वश केलेत? तेव्हा आपण उत्तर दिले:

प्रेम बाणी मन मारया।

गुरुंनी मला प्रेमाचा कण बहाल केला, प्रेमाच्या थेंबाचा माझ्या अंतर्यात वर्षाव केला. त्या प्रेमामुळे मन वश झाले. गुरुंच्या प्रेमाचे बाण इतके टोकदार आहेत की ज्यास एकदा का लागले की मग बाहेर निघत नाहीत.

माथे पीर शरीर जलत है कर्क कलेजे माही।

गुरु साहेब प्रेमाने सांगतात की गुरू नामदान देतेवेळी शब्द रुपाने अंतर्यात बसलेले आहेत. जर त्यांचे दर्शन झाले नाही तर मस्तकात वेदना होऊ लागतात, काळजात आग होऊ लागते. प्रेमीची अशी अवस्था होते.

एका व्यक्तीने रबिया बसरीला विचारले की,''गुरुरूप परमात्मा आलेले आहेत हे आपणास कसे समजते?''राबिया बसरीने उत्तर दिले,''जेव्हा माझ्या काळजात कळ येते तेव्हा डोळे आपोआपच बंद होतात, डोळ्यातून अश्रू वाहू लागतात, तेव्हा लक्षात येते. त्यावेळी मी आपला ध्यान-अभ्यास सुरू करते.''

प्रेमींनो, गुरू शिष्याच्या अंतरात प्रेमाचे रोप लावतात, त्यास सत्संगाचे पाणी देतात. परिपूर्ण महात्मा नाम देऊन दुर्लक्ष करीत नाहीत. सत्संगामुळे ध्यान-अभ्यासात वृद्धी होते. आपल्या परमात्मा गुरू कृपालजींनी सांगितले आहे,''शंभर कामं सोडून सत्संगात जा, हजार कामं सोडून ध्यान-अभ्यासात बसा. जोपर्यंत आत्म्यास आहार देत नाही तोपर्यंत शरीरास आहार देऊ नका. शरीराचा आहार अन्न आहे आणि आत्म्याचा आहार शब्द-नामाची कमाई आहे.'' आपले देखील कर्तव्य आहे की सहजोबाईंनी जे काही त्यांच्या वाणीत समजावले आहे त्यावर अंमल करावा व आपले जीवन सफल बनवावे.

***

संत कल्लरपट

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी वर्णिलेली एक अद्‌भूत घटना,
संतबानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान



ही गोष्ट संत कल्लरपटची आहे. संत कल्लरपट पटियाला गावी ढोंगी गुरु बनून लोकांना लुटून, आपला उदरनिर्वाह चालवायचा. त्याच्या मृत्युनंतर तो भूत बनला. एका मांत्रिकाने त्याला चिरून मौहमदी नामक व्यक्तीच्या शरीरात प्रवेश करवून दिला. कल्लरपट बऱ्याच काळापर्यंत मौहमदीच्या शरीरात राहून त्याला दु:ख देत राहिला. कालांतराने मौहमदीला सतगुरु कृपाल सिंहजींचा सहवास मिळाला. मौहमदीने नामदान प्राप्त केले आणि आपले दु:ख त्यांना सांगितले की मला आतल्या आत कोणीतरी त्रास देत आहे.

परमपिता कृपालजींनी दया करून त्याला सर्व परिस्थिती समजावून सांगितली की जो माणूस ढोंग करून लोकांना लुटून खातो किंवा लोकांकडून आपला आदरमान करवितो त्यास काळ नर्कात घालून दु:ख देतो.

जो कल्लरपट मौहमदीच्या शरीरात होता तो हुजूर कृपाल सिंहजींची वचने ऐकून गेल्या जन्माच्या गोष्टी करू लागला की सर्व लोक मला खूप मानत असत. जेव्हा लोक मला गुरुजी म्हणून संबोधायचे तेव्हा मला फार आनंद होत असे. आज मला ढोंगी गुरु बनून केलेल्या चुका समजल्या की मी स्वत:च मुक्त झालो नाही व भूत बनून लोकांना त्रास देत आहे.

कल्लरपट मौहमदीच्या शरीरात बोलत होता. तेव्हाच यमदूताने त्याला पकडून धर्मराजाच्या दरबारात हजर केले. धर्मराजाने हुकूम दिला की त्या नरकात एक घाणेरडे झोपडे आहे. तेथे अगोदरच एक ढोंगी गुरु आहे. याचे हात–पाय बांधून ह्यालादेखील तेथे फेका. तेथील साप या ढोंगी गुरूचे लचके तोडून–तोडून खातील. ह्याने जन्म–मृत्युच्या संसारात जाऊन जादू करून लोकांना लुटून खाल्ले, लोकांना आपला सेवक बनविले त्यामुळे त्याचीही मुक्ती झाली नाही व त्याच्या सेवकांचीही मुक्ती झाली नाही. आता ह्याचे सेवक साप बनून त्याचे मांसाचे लचके तोडून–तोडून खातील व ह्याच्याकडून त्या हिशोबाची परतफेड करून घेतील.

संत कल्लरपट मौहमदीच्या शरीरात किंचाळ्या मारत होता की सतगुरु मला क्षमा करा, मी माफी मागतो. जर आपल्या दारी येऊन देखील मी भूत बनून राहिलो तर मला कोण क्षमा करेल? संत पाषाणहृदयी नसतात. संतांच्या दरबारात दया व माफी असते, आपण माझ्यावर दया करून या खालच्या स्थराच्या व घृणास्पद योनीतून मला सोडवा.

हुजूर कृपालजींनी दया करून प्रसाद दिला, मौहमदीने प्रसाद खाल्ला व कल्लरपटची भूत योनीतून मुक्ती झाली. संत दयाळू असतात.

***

केहर सिंह

परमसंत अजायब सिंह महाराजांनी वर्णिलेली एक अद्‌भूत घटना
संत बानी आश्रम, राजस्थान

परमपिता कृपाल खूप दयाळू होते. मी त्यांच्या दयाळूपणाचे वर्णन करू शकत नाही. एके वेळची गोष्ट आहे, माझ्याच गावातील एक प्रेमी केहर सिंह आला, तो एक चांगला मनुष्य होता. तो येताच सतगुरुंवर मोहीत झाला. तो कधी–कधी संतमताविषयी चर्चा करीत असे व मला म्हणत असे की, मनुष्याचा गुरु मनुष्यच कसा होऊ शकतो? मनुष्य देव होऊ शकत नाही.'' मी त्याला कित्येकदा सांगितले की या सर्व गोष्टी तुझे मन करत आहे. ज्याक्षणी तुला गुरुंचे दर्शन होईल, तेव्हा तुझ्यात बोलण्याची हिंम्मत नसेल.

संत नाम देताना चूक करत नाहीत, जेव्हा जीव त्यांच्या चरणी येतो, तेव्हा त्यांना कळते की, याच्या डोक्यावर किती कर्मांचे ओझे आहे. भाई केहर सिंहाची कर्मंदेखील फार कठोर होती. हुजूर कृपालजींची इच्छा होती की त्याने काही काळ सत्संग ऐकावा व मगच यास नाम दिले जावे. कारण सत्संग ऐकल्याने कितीतरी कर्मं कमी होतात, परंतु केहर सिंहाची इच्छा होती की जर ही संधी मी हातातून गमावली, तर अशी सुसंधी पुन्हा लाभणार नाही. मग कदाचित मला नामच मिळणार नाही. त्याने हुजूर कृपालजींसमोर खूप नम्रतेने म्हटले की,''मी भरपूर पाप केलेले आहे, स्वत:वर देखील फार अन्याय केलेला आहे. परंतु आता माझी खात्री पटलेली आहे की मला क्षमा करणारा आलेला आहे.'' मग केहर सिंहाने हे यमक म्हणून दाखविले.

नाम विसार करे रस भोग, सुख सुपने ही तन में रोग।

हुजूर हसून म्हणाले की, ''जर तुला माहीत आहे की, वाणी अशी शिकवण देते तर त्यावर अमल का नाही करीत? जे लोक परमात्म्याची भक्ती न करता आपले जीवन व्यतीत करतात, त्यांना या संसार मंडळावर सुखप्राप्ती

होत नाही, ते चिंतेच्या आगीत होरपळत राहातात, मृत्युनंतर भूत–प्रेत बनतात व नरकात सडतात.'' जेव्हा हुजूर कृपालजींनी असे उद्‌गार काढले तेव्हा केहर सिंह विचारू लागला, ''हुजूर, या संसार मंडळावरील सर्व श्रीमंत–गरीब लोक चिंतेच्या चितेवर होरपळत आहेत. कोणास आपल्या शरीराची चिंता लागलेली आहे, कोणा स्त्रीला आपल्या नवऱ्याच्या बाबतीत दु:ख आहे, तर कोणा पुरुषास एखाद्या स्त्री विषयक दु:ख आहे, तर मग नरकात काय दुर्दशा होत असेल?'' हुजूर कृपाल सिंहजी महाराज म्हणाले,''भाई केहर सिंह, मी जर तुला सांगितले तर तुझा त्यावर विश्वास बसणार नाही. तू जर आपले डोळे बंद केलेस तर तुला तेथील केविलवाणी परिस्थिती पाहावयास मिळेल. जेव्हा केहर सिंहाने हुजूर कृपालजींच्या हुकूमानुसार आपले डोळे बंद केले, तेव्हा हुजूर कृपालजींनी केहर सिंहास नरकातील दृष्य दाखविले.

केहर सिंह नुकताच नरकातील परिस्थितीचे दृष्य पाहात होता, तितक्याच तेथे पाच–सहा यमदूत आले व आल्या–आल्या केहर सिंहास मारू लागले. केहर सिंह म्हणाला, ''मी इथे काहीही चोरले नाही, तर मग तुम्ही मला का मारत आहात?'' त्या यमदूतांनी धर्मराजाचा लिखित हुकूम दाखविला की तुझी इतकी सजा बाकी आहे. केहर सिंह निरुत्तर झाला. यमदूतांनी केहर सिंहाच्या जीभेला वेसण घातली (छिद्र पाडून त्यात दोरी घातली) व त्यास एका पशूप्रमाणे खेचत घेऊन जाऊ लागले आणि पुढे एका खूप मोठ्या नरकात त्याला टाकले. तेथील दगड आगीसारखे तप्त होते. त्या दगडांवर चालणारे एखाद्या गरम तव्यावरील रबर जसा वितळतो तसे वितळून पडत होते. तेथे अनेक आत्मा तडफडत होते.

त्यापुढे आणखी एक एक नरक होते, जिथे आत्म्यांच्या पायात टोकदार सूया टोचलेल्या होत्या व त्यांच्या डोक्यावर खूप जड दगडं ठेवली होती. जेव्हा आत्म्यांनी दु:खांना घाबरून यमाकडे पाणी मागितले तेव्हा यमाने पाण्याच्या बदल्यात रक्त आणि पू पिण्यास दिला. पू पण इतका गरम होता की तो

आगीसारखा प्रज्वलित होता. जेव्हा केहर सिंहास पिण्यासाठी तो पू दिला तेव्हा त्या पू चे दूध बनले. केहर सिंह पोट भरून दूध प्याला, कारण केहर सिंह हा चमत्कार परमपिता कृपालजींच्या दयेने पाहत होता. खुद्द परमपिता कृपालच हा चमत्कार त्याला दाखवत होते. केहर सिंहाने त्या आत्म्यांना सांगितले की तुम्हीपण माझ्या सतगुरु कृपालजींचे नाव घ्या, तर त्या पू चे दूध बनून जाईल. जेव्हा ते आत्मा हुजूर कृपालजींचे नाव घेऊ लागले तेव्हा यमदूतांनी त्यांच्या जीभा काढल्या की जेणेकरून ते आत्मा सतगुरुंचे नाव घेऊ शकू नयेत.

मग केहर सिंहास यमदूतांनी पुढच्या नरकात नेले. तेथे मनुष्य व स्त्रियांचे अर्ध्याहून जास्त शरीर जमिनीत गाडलेले होते. तेथे यमदूत कावळ्यांच्या वेषात त्यांना टोचा मारीत–मारीत खात होते व इतरही निरनिराळ्या शिक्षा देत होते. चारी बाजूंनी हाय! हाय! असे विवळण्याचे आवाज येत होते.

एक खूप मोठे जंगल होते. तेथे आगीशिवाय दुसरे काहीही दिसत नव्हते. तेथे हजारो आत्मा दाण्यांसारख्या भाजल्या जात होत्या. त्या आत्म्यांवर खूप मोठमोठे दगड ठेवले गेले होते. गरमीमुळे भयभीत व कासावीस होऊन त्या आत्म्यांनी पाणी मागितले तर यमदूतांनी पाण्याऐवजी त्यांच्या तोंडात आगीची धार सोडली. जेव्हा केहर सिंहाच्या तोंडात आगीची धार सोडली गेली तेव्हा त्या आगीचे पाणी बनले.

मग केहर सिंहास पुढच्या नरकात नेले. तेथे म्हाताऱ्या व तरुण महिला गुडघ्यापर्यंत जमिनीत पुरल्या गेल्या होत्या. त्यांचे हात वर करून बांधले गेले होते व जीभ दोरीने खेचून बाहेरच्या बाजूला बांधलेली होती. त्यांच्या छातीवर मोठ–मोठे दगड लटकावले होते. डोक्यावर गरम केलेले तप्त दगड ठेवले होते. त्यांच्या इंद्रियातून पू खालच्या बाजूला वाहत होता. ज्या महिलांनी आपल्या नैतिक बंधनातील भोगांव्यतिरिक्त इतर भोगवासना उपभोगल्या, त्यांची तशी दुर्दशा केलेली होती. यमदूत लोखंडी सळया गरम करून त्याच्या शरीरावर चटके देत होते.



तेथून केहर सिंहास पुढल्या नरकात घेऊन गेले तेथे आत्म्यांना तप्त दगडावर झोपवले होते. त्यांच्यावरून लोखंडी लाटणे फिरवून त्यांचे रक्त काढले जात होते. इतरही विविध तऱ्हेच्या शिक्षा नरकात आत्म्यांना दिल्या जात होत्या. मग यमदूत केहर सिंहास पुढल्या नरकात घेऊन गेले, जिथे मनुष्य व स्त्रीयांना गुडघ्यापर्यंत जमिनीत गाडले गेले होते. त्यांनी पृथ्वीवर पक्षांचे मास खाल्ले होते, म्हणून यमदूत पक्षांच्या वेषात त्यांचे मास तोडून खात होते. तेथे केहर सिंहाने सतगुरुंचे स्मरण केले की माझे रक्षण करा. तेथे सतगुरु कृपाल सिंह महाराजांनी केहर सिंहचे शरीर दगडाचे बनवले, ज्यामुळे त्याच्यावर यमदूतांचा जोर चालू शकत नव्हता. सर्व आत्मा हाय! हाय! करत होत्या! यमदूत त्यांना आगीत गरम करुन चाबकाने मारत होते. त्या आत्म्यांचे रोम-रोम आगीसारखे जळत होते. त्यानंतर त्यांना तप्त कढईमध्ये घातले जात होते. मग त्या कढईत मसाला घालून भाजीसारखे शिजवून यमदूत त्यांचे मांस खात होते. परंतु जेव्हा केहर सिंहास त्या कढईत घातले तेव्हा ती तप्त कढई थंड झाली. यमाने विचार केला याच्या पाठी एखाद्या महान संतांची ताकद आहे, त्यामुळे प्रत्येक शिक्षेपासून याची सुटका होते.

तेथून केहर सिंहास दुसऱ्या नरकात घेऊन गेले. तेथे मिरची बारीक दळून आत्म्यांच्या डोळ्यात घातली जात होती. केहर सिंहास एका छोट्या दरवाजातून काढण्याचा प्रयत्न केला गेला, त्या दरवाजात एक फूट लांब व रुंद असा रस्ता होता. केहर सिंह आडवा होऊन त्या दरवाजातून निघाला. केहर सिंहाचे पाय दरवाजाच्या बाहेरच होते, तेवढ्यात यमदूतांनी दरवाजा बंद केला, केहर सिंहाचे पाय कापले गेले. मग केहर सिंहाने परमपिता कृपालजींची आठवण केली. आठवण काढताच त्याचे पाय पूर्वीसारखे शाबूत झाले.

तेथून केहर सिंहास आणखी एका नरकात नेले, जेथे आगीसारखे गरम खांब होते. आत्म्यांना त्या खांबांशी चिकटविले जात होते. काही आत्मा पक्षांच्या रूपात उलट्या लटकवल्या होत्या. केहर सिंहाने विचारले, ''ह्यांनी काय गुन्हा केला आहे?'' यमदूतांनी सांगितले, ''ह्या आत्म्यांनी जन्म घेऊन पक्षांचे मास खाल्ले आहे, आता ह्यांना त्या गुन्ह्याची शिक्षा मिळत आहे.''

मग यमदूत केहर सिंहास त्याच्या पुढच्या नरकात घेऊन गेले,जेथे बाजार आगीसारखे जळत होते. तेथे आत्म्यांना अनवाणी चालवले जात होते. काही आत्मा उष्णतेत रबर वितळल्याप्रमाणे वितळत होत्या. त्यांच्यावर मोठ–मोठे तप्त दगड फेकले जात होते. त्यांनी केहर सिंहास दुसऱ्या रस्त्याने काढले. केहर सिंहाने विचारले, ''बाकीचे सर्व आत्मा त्या दिशेला जात आहेत, पण मला तुम्ही दुसऱ्या दिशेने का घेऊन चाललात?'' यमदूतांनी सांगितले, ''त्या रस्त्याने जे आत्मा चालले आहेत त्यांना युगांच्या हिशोबाने दगडांच्या खाली ठेवले जाणार आहे.'' यमदूतांनी केहर सिंहास विचारले की, ''तू खूप बोलतोस तुझ्यात काय विशेषता आहे?'' केहर सिंह म्हणाला,''तुम्ही मला मारू शकत नाही, कारण माझे सतगुरु कृपाल माझ्या पाठीशी आहेत, ज्यांच्या हुकूमावरून हे सर्व काही होत आहे. जर तुम्ही माझ्याशी अयोग्य केले तर मी पृथ्वीलोकावर जाऊन ह्या सर्व गोष्टी महाराज कृपाजींना सांगेन. आपल्यासारखे हजारो जीव त्यांच्या दरबारी द्वारपाल आहेत.''

केहर सिंहाने यमदूतांना विचारले की, ''इथे जीवांना इतकी कठोर शिक्षा का दिली जाते?'' यमदूतांनी सांगितले की, ''आम्ही तुला नाही सांगू शकत. तू धर्मराजाला विचार.'' जेव्हा केहर सिंह धर्मराजाकडे गेला तेव्हा धर्मराज म्हणाले,''तू इथे का आला आहेस?'' केहर सिंह म्हणाला की,''इथे आत्म्यांना इतकी कठोर शिक्षा का दिली जाते? त्यांनी काय पापं केली आहेत?'' तेव्हा धर्मराज म्हणाले, ''या आत्म्यांनी पृथ्वीलोकावर संत-फकिरांना अनेक प्रकारे दु:ख दिले आहे. आता या आत्म्यांना युगांच्या हिशोबाने तप्त कढईत आणि तप्त दगडाखाली होरपळत राहावे लागणार आहे.''

मग केहर सिंहास दुसऱ्या नरकात नेले. तेथे जमिनीत गवताच्या जागी तीक्ष्ण खिळे गाढलेले होते. आत्म्यांना करोडो फूट वरती आणून त्या तीक्ष्ण खिळ्यांवर फेकले जात होते. अनेक आत्म्यांचे शरीर त्या खिळ्यांवर पडताच दाणे सांडल्याप्रमाणे अस्ताव्यस्त होत होते. जेव्हा केहर सिंहास देखील ही शिक्षा देऊ लागले, तेव्हा केहर सिंहाने सतगुरु कृपालजींची आठवण काढली की ह्या कठीण व अडचणीच्या वेळी मला वाचवा. जेव्हा कहर सिंहाने प्रार्थना केली तर क्षणार्धातच सतगुरु तेथे पोहोचले! सतगुरुंनी दुरूनच उभे राहून उजव्या हाताने इशारा केला तप्त असलेले नरक ठंड झाले. यमदूत पळून गेले. मग परमपिता कृपाल केहर सिंहास सोबत घेऊन पृथ्वीलोकावर आले.

हा सर्व वृत्तांत केहर सिंहाने अनेक प्रेमींना सांगितला. तो म्हणाला, जर आज मला सतगुरुंचे दर्शन झालेले नसते, तर मलादेखील त्या नरकातील असाह्य शिक्षा भोगाव्या लागल्या असत्या, कारण मी सुद्धा खूप पापं केलेली आहे. सतगुरुंनी दया करून मला थोड्याच वेळात दाखवून दिले की जीव जे काही पाप करतो, त्याचे फळ त्यास अवश्य भोगावे लागते. काही दिवसांनी केहर सिंहाने देहत्याग केला. त्याअगोदार हुजूर कृपालजींनी त्यास नाम दिलेले होते. हुजूर कृपालजींनी अत्यंत करुणामय होऊन त्यास आपल्या चरणी स्थान दिले, अंतसमयी त्यांचा सांभाळ केला.

***